**ठळक बातम्या**

- भारत आणि न्यूझीलंडमध्ये आज मुक्त व्यापार करार, दोन्ही देशातला व्यापार दुप्पट करण्याचं लक्ष्य

- रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा बोलण्याची सक्ती करण्याच्या निर्णयाला मुदतवाढ देण्याची सरकारची तयारी

- मुंबईत २ दुर्घटनांमध्ये ७ जणांचा मृत्यू

**आणि**

- अकोला आणि अमरावती आज उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान आज दिल्लीत मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या झाल्या आहेत. यामुळं दोन्ही देशातला व्यापार दुप्पट होईल, अशी आशा केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज नवी दिल्लीत व्यक्त केली. येत्या पाच वर्षांच्या काळात द्विपक्षीय व्यापार पाच अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचं या कराराचे उद्दिष्ट आहे. या कराराच्या वैशिष्ट्यांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - - व्हाइस कास्ट - - -**

*(दोन्ही देशांमध्ये मुक्त व्यापार कराराच्या चर्चा २०१० मध्ये सुरू झाल्या होत्या. चर्चेच्या नऊ फेऱ्या झाल्यावर २०१५ मध्ये या चर्चा स्थगित झाल्या होत्या, पण मार्च २०२५ पुन्हा या चर्चांना सुरुवात झाली. देशातले शेतकरी आणि सूक्ष्म-मध्यम-लघु उद्योगाच्या हितांचं रक्षण करण्यासाठी दुग्धजन्य उत्पादनं, मांस, कांदा, मका, हरभरे, बदाम, साखर यासारख्या वस्तू या करारात समाविष्ट नाहीत. शस्त्रं, दाग-दागिने, तांब्याच्या वस्तू यांचाही यात समावेश नाही.*

*वस्त्रोद्योग, प्लास्टिक, चामडं, अभियांत्रिकी क्षेत्रातली भारतीय उत्पादनं आता करमुक्त होतील. यावर आधी सरासरी २ पूर्णांक ३ दशांश टक्के कर होता. येत्या १५ वर्षात न्यूझीलंड भारतात २० अब्ज अमेरिकन डॉलरची गुंतवणूक करणार आहे. या करारां ंअंतर्गत ५ हजार*

*भारतीयांना न्यूझीलंडमध्ये रोजगारासाठी तात्पुरता विसा मिळेल आणि ३ वर्षांसाठी राहता येईल.*

*या करारामुळं न्यूझीलंडच्या भारतात निर्यात होणाऱ्या ५४ टक्क्यांहून अधिक वस्तू करमुक्त होतील. त्यात मांस, लोकर, कोळसा आणि इतर वस्तूंचा समावेश आहे. याशिवाय सफरचंद, किवि, मध यासारख्या वस्तूंच्या आयातीवर सवलत मिळेल आणि आयातीची किमान किंमत निश्चित केली जाईल. लोह, स्टील, भंगारातले ॲल्युमिनियम यासारख्या वस्तूंवर आकारला जाणार कर १० वर्षांसाठी माफ केला जाईल.)*

**<><><><><>**

राज्यातल्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा बोलणं सक्ती करण्याचा निर्णय पुढे ढकलण्यात आला असून मुदतवाढ देण्याचा निर्णय उद्या घेतला जाईल अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज केली. मुंबईत आज टॅक्सी-रिक्षा चालकांच्या विविध संघटनांसोबत बैठक झाल्यानंतर सरनाईक वार्ताहरांशी बोलत होते. या बैठकीत सर्व संघटनांसोबत सकारात्मक चर्चा झाली. मराठीतून बोलण्याला कुणाचीही हरकत नाही असं सर्व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितलं. मात्र त्यांना काही दिवसांची मुदत हवी आहे, सर्व रिक्षा-टॅक्सी चालकांचे मराठी शिकवणी वर्ग घेतले जातील असं पदाधिकाऱ्यांनी मान्य केल्याचं सरनाईक यांनी सांगितलं. कुणाचाही रोजगार बुडणार नाही याची काळजी सरकार घेईल अशी हमी सरनाईक यांनी दिली.

**- - होल्ड बाईट सरनाईक - -**

सरकार आजही मराठी सक्तीच्या निर्णयावर ठाम असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं तसंच महाराष्ट्रात काम करायचं असेल तर मराठी यायलाच हवी याचा पुनरूच्चार सरनाईक यांनी केला.

**<><><><><>**

आपच्या ७ खासदारांचा भाजपामध्ये प्रवेशाचा अर्ज राज्यसभेचे अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी मंजूर केला आहे. त्यामुळं राज्यसभेतल्या भाजपाच्या खासदारांची संख्या ११३ झाली असून आपचे ३ खासदार उरले आहेत. राघव चड्ढा, अशोक मित्तल, हरभजन सिंग, संदीप पाठक, विक्रमजित साहनी, स्वाती मालिवाल आणि राजींदर गुप्ता यांनी शुक्रवारी

भाजपा प्रवेशाचा निर्णय जाहीर केला होता. त्याला रविवारी आपने आक्षेप घेऊन त्यांचं सदस्यत्व रद्द करण्याची मागणी केली होती.

**<><><><>**

मुंबईत एका कुटुंबातल्या चौघांचा अन्नातून विषबाधा होऊन मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये एक जोडपं आणि त्यांच्या दोन अल्पवयीन मुलींचा समावेश आहे. या कुटुंबाने दक्षिण मुंबईतल्या आपल्या घरात एका कौटुंबिक सोहळ्याचं आयोजन केलं होतं. तिथे आलेल्या पाहुण्यांसोबत त्यांनी जेवण केलं. पाहुणे निघून गेल्यानंतर या कुटुंबाने कलिंगड खाल्लं होतं. त्यानंतर त्यांना उलट्यांचा त्रास सुरू झाला. या सर्वांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र चौघांचा मृत्यू झाला. कलिंगडामुळे विषबाधा झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

**<><><><>**

मुंबईत आज सकाळी मरिन ड्राईव इथं झालेल्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला. पहाटे पावणेसहाच्या सुमाराला पारसी जिमखानाजवळ सिग्नल चुकवून वेगात जात असलेल्या मोटार सायकलस्वाराने रस्ता ओलांडणाऱ्या पादचाऱ्याला धडक दिली. मोटार सायकलस्वार, मागे बसलेली महिला तसंच पादचारी या तिघांनाही रुग्णालयात दाखल केले असता त्यांना मृत घोषित करण्यात आलं.

**<><><><>**

जालन्यात काल रात्री दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर झाला. भोकरदन तालुक्यातल्या नळणी–राजूर मार्गावर हा अपघात झाला.

**<><><><>**

राज्यात आजपासून कृषी केंद्र विक्रेत्यांनी बेमुदत बंद पुकारला आहे. याचा फटका भंडारा जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांना बसत आहे. रासायनिक खत पुरवठा करणाऱ्या कंपन्यांची खतांबरोबर अन्य अनावश्यक औषधांची सक्ती केली जाते, ती बंद व्हावी या आणि अशा अनेक मागण्या कृषी केंद्र विक्रेत्यांनी केल्या आहेत. या संपामुळे उन्हाळी पिकांसाठी लागणारं साहित्य मिळत नसल्यानं शेतकऱ्यांसमोर प्रश्न उभा राहिला आहे.

**<><><><>**

'प्रधान मंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६' साठीची नामनिर्देशने खुली करण्यात आली आहेत. या पुरस्कारासाठी ५ ते १८ वर्ष वयोगटातल्या मुलांची निवड केली जाते. शौर्य, समाजसेवा, पर्यावरण, क्रीडा, कला आणि संस्कृती, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या मुलांना राष्ट्रपतींच्या हस्ते दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. नामनिर्देशने सादर करण्याची अंतिम तारीख ३१ जुलै आहे. ही नामनिर्देशने awards.gov.in या संकेतस्थळावरच्या 'राष्ट्रीय पुरस्कार पोर्टल' वर स्वीकारली जातील.

<><><><>

देशभरातल्या हस्तलिखितांचे सर्वेक्षण, दस्तावेजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन आणि प्रसार करणे हा उद्देश असलेल्या 'ज्ञानभारतम' प्रकल्पातल्या सर्वेक्षणाचा टप्पा १६ मार्चपासून सुरु झाला आहे. हस्तलिखितांचा एक राष्ट्रीय डिजिटल संग्रह तयार करुन तो राष्ट्रीय तसंच आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधक आणि सामान्यांसाठी उपलब्ध करुन देणे हा या प्रकल्पामागचा उद्देश आहे. यासाठीची राज्य नोडल संस्था म्हणून राज्याचा पुराभिलेख संचालनालय काम करणार आहे. आपल्याकडे हस्तलिखितं असतील तर ग्यानभारतम या ॲपवर नोंदवावी असं आवाहन राज्य सरकारनं केलं आहे.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्सचा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूशी होणार आहे. नवी दिल्लीत अरुण जेटली मैदानावर संध्याकाळी साडे सात वाजता या सामन्याला सुरुवात होईल. काल झालेल्या पहिल्या सामन्यात गुजरात टायटन्सने चेन्नई सुपर किंग्जवर आठ गडी राखून विजय मिळवला. चेन्नईने दिलेलं १५९ धावांचं लक्ष्य साई सुदर्शनच्या ८७ धावांच्या खेळीवर गुजरात टायटन्सने सतराव्या शतकातच पूर्ण केलं. कालच्या दुसऱ्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सने लखनौ सुपर जायंट्सचा पराभव केला. कोलकाता नाईट रायडर्सने केलेल्या १५६ धावांचा पाठलाग करताना लखनौ संघाला १५५ धावाच करता आल्या. त्यानंतर झालेल्या सुपर ओव्हरमध्ये लखनौ संघाने २ गडी गमावून १ धाव केली. कोलकाता संघाने एकाच चेंडुत चौकार लगावत सामना जिंकला.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत नियमांचं उल्लंघन केल्याप्रकरणी कोलकाता नाईट रायडर्सचा फलंदाज अंगक्रिश रघुवंशी याला सामना शुल्काच्या २० टक्के दंड भरावा लागणार

आहे. लखनौ सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यात त्याच्या आक्रमक वर्तनासाठी आयपीएलकडून ही कारवाई करण्यात आली आहे.

**<><><><><>**

हवामान विभागानं अकोला आणि अमरावती जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. याशिवाय ठाणे, पालघर, रायगड, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, नागपूर या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी आज उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. तर चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी पावसाची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**